महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
" कस्तुरी बिल्डीग" तळ मजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८८०११६/११८/विस्तारीत-४१० EMail ID :- aao.prashakosha-mh@gov.in

संदर्भ:

१. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.पीएवाय-१०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३, दि.०६.११.१९८४
२. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५.
३. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, वित्त विभाग क्र.११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.०१.०४.२०१०.
४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन वित्त विभाग क्र.वेतन/१११११ प्र.क्र.८/सेवा-३ , दि.०१.०७.२०११
५. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.आप्रयो/१०१५ प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ ,दि.२३.१२.२०१५
६. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२०.०२.२०१९
७. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन ११११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा.३, दि.०२.०३.२०१९
८. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन११११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा.३, दि.०७.१०.२०२२
९. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेपुर ११२१//प्र.क्र.४/सेवा.९, दि. १३.०२.२०२३

क्र.संलेको/प्रशा कोषा/कार्या.३/आप्रयो लाभ /आदेश / २०२६/ 185 दिनांक : 17 FEB 2026

**//आदेश//**

**विषय :- राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदाचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत.**

उपरोक्त संदर्भ क्र.७ वरील शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगाच्या कालावधीमध्ये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आली आहे.

त्यानुसार संचालनालयाच्या अधिनस्त लघुटंकलेखक गट - क संवर्गातील वेतनश्रेणी एस-०८ (वेतन संरचना २५५००-८११०० या वेतन संरचनेत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत "लघुलेखक (निम्नश्रेणी)" या संवर्गातील पदाची वेतनश्रेणी एस-१५ (वेतन संरचना रु.४१८००-१३२३००) त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या दिनांकापासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करीत आहेत.

संचालनालयातील खालील कर्मचाऱ्यांना १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ :

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव सध्याचे पदनाम, विभाग | शासन सेवेतील नियुक्तीचा दिनांक व पद | नियुक्ती नंतर मिळालेल्या पदोन्नतीचा दिनांक व पदनाम | तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक व पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम. पूजा महेंद्र लांडगे, लघुटंकलेखक संचालनालय, लेखा व कोषागारे मुंबई | १६.०१.२०१६ लघुटंकलेखक | निंरक | १६.०१.२०२६ लघुलेखक (निम्नश्रेणी) |
| २ | श्रीम. सिमा युवराज पाटील, लघुटंकलेखक संचालनालय, लेखा व कोषागारे मुंबई | १८.०१.२०१६ लघुटंकलेखक | निंरक | १८.०१.२०२६ लघुलेखक (निम्नश्रेणी) |

**अटी व शर्ती:-**

१ संबंधित कार्यालय प्रमुखांद्वारे सदर कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून देण्यात यावा.

२. संदर्भांकीत १ वरील शासन निर्णयान्वये व संदर्भाकीत ६ वरील शासन परिपत्रकान्वये संबंधित कर्मचाऱ्याचा वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीकरिता विकल्प घेण्यात यावा व त्यानुसार वेतननिश्चिती करण्यात यावी.

३. सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी त्यांना संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदीच्या अधीन राहून नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतननिश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतननिश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणेच करण्यात येईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित / कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

४ संदर्भ क्र.४ वरील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात यावेत, मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येऊ नये. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात यावी.

सदरचे आदेश www.mahakosh.maharashtra.gov.in या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

(दीपा देशपांडे)
**संचालक,**
**संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत –**

१. लेखा अधिकारी,रोख शाखा मुख्यालय, मुंबई
२. संबंधित कर्मचारी ( कार्यालयामार्फत).
३. निवड नस्ती (प्रशा कोषा)